महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १४४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०२/२०१७

**१) किराणा दुकानातील सामानाची चोरी . :–**

दिनांक २५+२६ /०२/२०१७ वा. चे रात्र. दर. यातील फिर्यादी रवीकुमार सुनील चुन्हे वय ३२ वर्ष रा. सौदड त. सडक अर्जुनी जिल्हा गोदींया याचे किराणा दुकानाचे समोरील शर्टसचे ताले कोणीतरी अज्ञात चोराने तोडुन आत प्रवेश करुन दुकानात ठेवलेले तांदुळ एचएमटी २० किलो, सरसो तेलाचा ५०० ग्रॅमचे १० बॉटल, २०० ग्रॅमच्या ०८ बॉटल, १०० ग्रॅमच्या ४ बॉटल, एव्हरेस्ट मसाला २०० ग्रॅमचे ३ पॅकेट, पारले बिस्कीट पॅकट २४ नग, २०/२० बिस्कीट पॅकेट १० नग, असा एकुण २,१००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पोस्टे साकोली हे करीत आहेत.

**२) गळफास लावुन युवकाचा मृत्यु . :–**

दिनांक २६/०२/२०१७ चे १७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा उकारा गावचा पोलीस पोटील असुन गावातील लोकांचे चर्चेवरुन उकारा गावचा पोलीस पाटील असुन गावातील लोकांचे चर्चेवरुन उकारा जंगल शिवारात गेला असता जंगल शिवारातील एका चिंचेच्या झाडाला १ इसम पिवळया नायलॉन चे दोरीने गळफास लावुन मरण पावलेला दिसला चिंचेच्या झाडाचे बाजुला पॅशन प्रो कंपनीचे मोटार सायकल क्र. एमएच २३ एएम ९२८० उभी दिसल्याने फिर्यादीने पोलीसांना फोनवदारे कळविताच पोलीस घटनास्थळी येवुन प्रेत झाडवरुन उतरवीले. प्रेताचे अंग झडतीत त्याने घातलेला जिन्स पॅन्टच्या मागील खिश्यात कथ्था रंगाचे पर्स मधील मृतक गोवींदा अभीमन्यु शेळके वय २७ वर्ष, रा. वांगी पोस्टे शिवनी जिल्हा बीड याने लिहून ठेवलेल्या चिठ्ठीवर त्याचे नाव लिहलेले दिसले तसेच त्याने मी गावापासुन खुप दूर अंतरावर असल्यामुळे माझे मन याठिकाणी लागत नाही. येथील वातावरणामधेही सतत आजारी पडत आहे. त्यामुळे मी माझे जीवन संपवित आहे. माझे मरणा बाबत कोणीही कारणीभुत नाही अशी लिहलेली चिठ्ठी मिळाली असून पोलीसांनी घटनास्थळावरुन जप्त केली आहे. पुढील कारवाई करीता तक्रार देत आहे. असे फिर्यादी माणीक सिताराम तरोणे वय ४० वर्ष, रा. उकारा याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पाटील पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

**३) क्षुल्लक कारणावरुन लाखडी दांडयाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/०२/२०१७ चे १४.१५ वा. दरम्यान यातील आरोपीने जखमी नानाजी निलकंठ कठाणे यास आमचे कामठेच्या घरी का बसला असे बोलुन अचानक लाखडी दांडयाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक २६/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. करडी, तुमसर व सिहोरा येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ८५ लिटर हातभटटी दारु सडवा + साहीत्य + १ मोटार सायकल किंमती ३७,५५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

27.2

(एस. व्ही. कुलकर्णी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.